# <u>हनुमान</u>

हनुमंत महाबली बजरंग
रंगवी तो रामरंगी अंतरंग
रामदूत रामकामी नित्य दंग
राम भजनी राम सेवक गुंग

राम नाम घेऊन तो भक्तोत्तम
राम काम करून तो दासोत्तम
राम प्रिय तो त्यांस घाबरे यम
चिरंजीव कोणी नसे त्याच्या सम

स्मरण मारुतीचे रामस्मरण
जेथे जेथे राम तेथे हनुमान

– नारायण
०९/२३/२३